बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३६ | बुधवार, दि.१४ ऑगस्ट २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# न्यायालय व प्रशासकीय इमारत परिसरात शौचालय देण्याची मागणी

## आधार महिला शक्ति संघटना आणि वामा महिला सुरक्षा दल ने केले आंदोलन



**गोंदिया:** मोठी बाजारपेठ असलेल्या गोंदिया शहरातील मुख्य चौकात महिलांसाठी सार्वजनिक शौचालय आणि मुतारीची व्यवस्था नाही. त्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या महिलांची मोठी कुचंबना होत आहे. तथापि,लोकप्रतिनिधी व नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दखल घेऊन आम्हाला न्याय द्यावा,अशी मागणी महिलांनी केली होती.यासोबतच गोंदियाती सामाजिक कार्यकर्त्या प्रा.डॉ.सविता बेदरकर यांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या उदासिनतेवर आपले विचार व्यक्त केले होते.त्याची दखल घेत बेरार टाईम्सने यासंदर्भात वृत्त प्रकाशित करुन प्रशासनाचे लक्ष वेधले होते.आता भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेशी जुळलेल्या व विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागताच येथील महिला संघटनांना जाग आली असून न्यायालय व प्रशासकीय इमारत परिसरातील रस्त्यावर सार्वजनिकरित्या उघड्यावर लघुशंका करीत असल्याबद्दल सोमवार १२ ऑगस्टला आंदोलन करुन प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. भाजपच्या माजी नगरसेविका भावना दिपक कदम यांच्या नेतृत्वात आधार महिला शक्ति संघटना आणि वामा महिला सुरक्षा दलाच्यावतीने आंदोलन करुन उपविभागीय अधिकारी,शहर पोलीस निरिक्षक व नगरपरिषद प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाकडे लक्ष न दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा या महिला संघटनांनी दिला आहे.

निवेदन देतेवेळी एड मेघा राहंगडाले, एड दर्शाना रामटेके, शिल्पा पटले,सरोज पांडे, रसिका पटोले, सारिका सोनी, रंजीता कनौजिया, भाविका जैन, हेमलता पटोले, रंजना मेश्राम, पूजा जायसवाल, गौरी शर्मा,वैशाली चंदेल , रितु मंडल, चंदा मिश्रा, रमा मिश्रा, संगीता बेलगे, कौशल्या खदवानी, विजेता बहेकर आदी उपस्थित होत्या.

गोंदिया शहर म्हटले की राष्ट्रीय नेत्यांचा शहर अशी ओळख. त्यातच सध्या राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा गवगवा मोठ्या उत्साहाने सर्वच राजकीय पक्षाचे आजी-माजी लोकप्रतिनिधी




होर्डिंगच्या माध्यमातून करू लागले आहेत.मात्र, या नेत्यांना आपल्या शहरातील शासकीय कार्यालयाशेजारील चौक असो की, बाजारपेठेतील गर्दीचे ठिकाण असो, त्या ठिकाणी महिलांसाठी शौचालय व मुतारीची व्यवस्था करायची आठवण आली नाही. परिणामी,या लोकप्रतिनिधींच्या निर्लज्जपणाचा कळस म्हणावा की काय गाव खेड्यासह शहरातील अनेक महिला-बहिणींसह भावांना उघड्यावर शौचालयसह लघुशंका करण्याची वेळ आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून जयस्तंभ चौक, नेहरु चौक, मुख्य भाजी बाजार, स्टेडियम परिसर, गोरेलाल चौक आदि परिसरात महिलांकरिता शौचालय व मुतारीची व्यवस्था करण्यात यावी याकरिता नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यासह उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदने सादर झाली. मात्र या अधिकाऱ्यांना यांच्या घरातील कुणावर त्या ठिकाणी उघड्यावर लघुशंक किंवा शौचालयाची वेळ आली नाही, म्हणूनच की काय यांनी त्या निवेदनांना कचऱ्याच्या पेटीत टाकले.आता या महिला संघटनांच्या निवेदनाची तरी दखल प्रशासन घेते काय याकडे लक्ष लागले आहे.

शहरातील मुख्य चौक असलेल्या जयस्तंभ चौकात न्यायालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय असलेल्या प्रशासकीय इमारतीत ४० च्यावर विविध विभागाचे कार्यालय आहेत.

शेजारीच वाहतूक पोलिस, पंचायत समिती कार्यालय व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय आहे. या सर्व कार्यालयात गाव खेड्यातून मोठ्या प्रमाणात महिला-पुरुष येतात. त्यातच या परिसरातच शाळा-महाविद्यालय असल्याने विद्यार्थिनींची संख्या खूप मोठी आहे.

या चौकात जेव्हा या सर्व महिला-पुरुष विद्यार्थिनी बस किंवा खासगी वाहनाची वाट बघत असतात अशावेळी त्यांना लघुशंका व शौचलय लागले तर जावे कुठे? असा प्रश्न अनेकदा नव्हे तर दररोज उपस्थित होतो. नाईलाजाने शौचालय व मुतारीची सोय नसल्याने न्यायलय व प्रशासकीय इमारतीच्या मध्य असलेल्या रस्त्याच्या कडेलाच दिवसाढवळ्या पुरुष लघुशंका करीत असतात. त्याचवेळी त्या रस्त्याने जाणाऱ्या आया-बहिणींना मात्र खाली मान करुन शरमेने जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. तरीही मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या गवगवा करणाऱ्या व त्यांचे अर्ज भरण्याकरिता कार्यालय उघडणाऱ्या त्या नेत्यांनी आधी या समस्येचे निराकरण करावे. नंतरच लाडक्या बहिण योजनेचा उदोउदो करावा असा सूर जनतेतून उमटू लागला आहे.

# केंद्राचे संशोधन केवळ कागदावरच

**गोंदिया:** आमगाव नजीक असलेल्या माल्ही येथे १३.३० हेक्टर जागेत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि कृषी विभागाचे कृषी संशोधन केंद्र आहे. अगदी मोक्याच्या जागेवर या दोन्ही विभागाचे कार्यालय व जमीन आहे. मात्र, संशोधन केवळ कागदोपत्री होत आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन, नव्या संशोधनाची जवाबदारी या विभागाची आहे. मात्र असलेल्या जागेतच लागवड खर्च निघेल इतकेही उत्पन्न होत नाही. त्यामुळे शासनाचा या विभागांवरचा खर्च निरर्थक ठरत आहे. त्यामुळे संशोधन केवळ कागदावरच असल्याचे दिसत आहे.

आमगाव ते लांजी मार्गावर वाघनदीच्या अगदी तीरावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि कृषी विभाग यांचे संशोधन केंद्र आहे. या दोन्ही विभागांची कार्यालये वेगवेगळी आहेत. पंजाबराव देशमुख कृषी संशोधन केंद्राची देखभाल संशोधन केंद्राच्या अधिकाऱ्यांकडे आहे.



### रविवारी कार्यालय कर्मचाऱ्यांविना

**कृषी विभागाच्या संशोधन केंद्रात दोन कृषी पर्यवेक्षक आणि दोन शिपायांची पदे मंजूर आहेत. कृषी पर्यवेक्षकांची दोन्ही पदे भरण्यात आली आहे. त्यातील एक कर्मचारी गोंदिया कार्यालयात अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. शिपायाचे एक पद रिक्त आहे. एकच असलेल्या शिपायाला रविवारी सुटी असते. त्यामुळे रविवारी हे केंद्र कर्मचाऱ्यांविना असते.**

तर कृषी विभागाचे शासकीय संशोधन केंद्र कृषी विभागाकडून हाताळण्यात येते. याठिकाणी दोन्ही विभागांना संश्रोधनासाठी १३.३० हेक्टर जागा दिली आहे. गेल्या आठ ते दहा वर्षापुर्वी हे संशोधन केंद्र नावारुपाला आले होते. या कार्यालयाची भव्यता सर्वांनीच अनुभवली. संशोधनाचे उत्तम कार्य येथून सुरु होते. मात्र, त्यानंतर शासनाकडून संशोधन केंद्राकडे दुर्लक्ष केल्याने आता संशोधन केंद्राचा परिसर अडगळीत पडला आहे. संशोधन केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यास गुडघाभर गवत वाढलेल्या रस्त्यावरुन आत जावे लागते. त्या गवतातून कधी एखादा साप समोर येईल याची शास्वती नाही. नावालाच संशोधन केंद्र आहे. शेतकऱ्यांची रोवणी जोमात सुरु आहे.

मात्र येथील पऱ्हे अत्यंत निकृष्ठ असून रोवणीयोग्य नाही. त्यामुळे केंद्र नेमके संशोधन कशाचे करते, हेच समजण्यापलिकडे आहे. एकेकाळी वैभव अनुभवलेल्या विश्रामगृहाला गळती लागली. मोठी मालमत्ता असतानाही शासन दुर्लक्ष का करत आहे हे कळण्यापलिकडचे आहे.

### रिक्त पदांचाही त्रास

**पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत संशोधन केंद्राकडे ३.३० हेक्टर जागा आहे. त्यापैकी १.१० हेक्टर जागा बांधकामासाठी राखीव आहे. या संस्थेकडे बियाणे तयार करुन ते शेतकऱ्यांना विक्री करणे आणि उरलेले बियाणे शसकीय केंद्रावर विक्री करणे असे काम आहे. मात्र, पेरणीच होत नसल्याने शेतकऱ्यांना काय बियाणे उपलब्ध करुन देणार, अशी स्थिती आहे. या कार्यालयात एकुण सात पदे मंजूर आहेत. त्यापैकी फक्त तीन पदे भरली असून त्यात कृषी सहाय्यक, वरिष्ठ संशोधन सहाय्यक आणि मजूर यांचा समावेश आहे.**

### असे बियाणे घेणार कोण?

**संशोधन केंद्राकडे १० हेक्टर जागा असून ६ हेक्टर लागवडीखाली आणि ४ एकर पडीत आहे. या केंद्रामार्फत महाबिज कंपनीसाठी बियाणे तयार करण्याचे काम आहे. या कार्यालयात एक कृषी पर्यवेक्षक आणि एक चौकीदार कार्यरत आहे. बियाणे तयार करण्यासाठी शासनाकडून पैसा देण्यात येते. मात्र, येथील धानाची स्थिती बघून असे धान घेणार तरी कोण, असाच प्रश्न पडतो. यासंदर्भात उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.**

# नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षांवरून पाच वर्षांवर; शिंदेंच्या कॅबिनेटने घेतले ८ महत्वाचे निर्णय...

**मुंबई:**-:-विधानसभा निवडणूक जवळ येऊ लागताच शिंदे सरकार विरोधकांना अडचणीत आणण्यासाठी एका मागोमाग एक असे धडाधड निर्णय जाहीर करत सुटले आहे.तर येत्या काही महिन्यांत विधानसभा निवडणूक असल्याने आता होणारी मंत्रिमंडळाची प्रत्येक बैठक ही महत्त्वपूर्ण मानली जात आहे.त्यामुळे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या कॅबिनेटच्या बैठकीत एकूण ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जात नाहीत. यामुळे विरोधक पराभवाच्या भीतीने सरकार टाळत असल्याची टीका करत आहेत.अशातच शिंदे सरकारने नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्यास मंजुरी दिली आहे. तसेच विदर्भ मराठवाड्यासाठी दोन निर्णय घेण्यात आले आहेत.त्यानुसार विदर्भ आणि मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देण्यासाठी राज्य सरकारने १४९ कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला आहे.तर मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा लाखो नागरिकांना लाभ होणार आहे.या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित होते.

डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू केली जाणार आहे.यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्यात आली आहे.

शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापाकाना ठोक मानधन देण्यात येणार आहे.सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण. सुधारित ३७ हजार कोटी खर्चास मान्यता देण्यात आली.

# जुन्या पेन्शनसाठी सरकारी कर्मचारी २९ ऑगस्टपासून पुन्हा संपावर?-आशिष रामटेके

**गोंदिया :** जुन्या पेन्शनप्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या आश्वासनाची शासनाने पूर्तता करावी, या मागणीसाठी राज्य सरकारी - निमरसराकी कर्मचारी संघटनेतर्फे २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा बेमुदत संपावर जाणार आहे. मुंबईत झालेल्या संघटनेच्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे राज्य सहसचिव आशिष प्र. रामटेके यांनी कळविले आहे.



जुन्या पेन्शन योजनेसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी मार्च २०२३ मध्ये सात दिवसांचा बेमुदत संप केला होता. सरकारने संपकर्त्यांशी चर्चा करून संप मागे घेण्याचे आवाहन केले होते. खुद्द मुख्यमंत्र्यांनी जुन्या पेन्शन प्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल, असे लेखी आश्वासन कर्मचारी संघटनांना दिले होते. मात्र त्यानंतर डिसेंबर २०२३ पर्यंत याबाबत कोणतीच सकारात्मक कार्यवाही शासनाकडून करण्यात आली नाही. त्यामुळे १४ डिसेंबर २०२३ ला पुन्हा संप करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला होता. त्यानंतर राज्य शासनाने पुन्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलवले व अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वतन योजना जाहीर केली.मात्र आतापर्यंत शासनाने याबाबत शासन निर्णय किंवा अधिसूचना काढली नाही. त्यामुळे राज्यातील सुमारे साडे आठ लाख कर्मचारी, शिक्षकांमध्ये सुधारित पेन्शन योजना लागू करण्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. सरकारने यापूर्वी दिलेल्या आश्वासनांचे काय झाले? असा सवाल संघटनेच्या नेत्यांनी केला आहे. यासंदर्भात नुकतीच मुंबईत राज्यस्तरीय समन्वय समितीची बैठक पार पडली. त्यात सरकारने दिलेल्या आश्वासनाबाबत चर्चा करण्यात आली आणि २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे राज्य सहसचिव आशिष प्र. रामटेके यांनी यासंदर्भात प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

**काय आहेत मागण्या**

केंद्राप्रमाणे ग्रॅच्युअटी मिळावी, १२ वर्षानंतर सेवानिवृत्ती वेतन, अंश राशीकरण पुनर्स्थापना करावी, केंद्राप्रमाणे १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात, अधिसूचनाव्दारे नियुक्ती प्रक्रिया सुरू झालेल्या कर्मचारी, शिक्षकांना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी, सेवानिवृत्तीचे वय ६० करावे, विविध संवर्गात रिक्त असलेली ४० टक्के पदे त्वरित भरावी, शिक्षक विभागात शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी विशेष चर्चासत्र आयोजित करावे, आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढावी,आदी मागण्या संघटनेच्या आहेत. या मागण्यांसाठी मुख्य सचिवाकडे विशेष बैठक आयोजित करून त्यावर मार्ग काढावा, अशी मागणी आहे.

# देवरी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी परत मिळणार का?

देवरी: - गेल्या वर्षभरापूर्वी देवरी पंचायत समितीमध्ये कार्यरत विस्तार अधिकारी (पंचायत) यांना सालेकसा पंचायत समितीमध्ये प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले होते. आजमितीला सालेकसा पंचायत समितीमध्ये नियमित विस्तार अधिकाऱ्याचे पद भरले असताना सालेकसा गटविकास अधिकाऱ्यांनी देवरीचे विस्तार अधिकारी परत न पाठविल्याने देवरी तालुक्यावर अन्याय होत असल्याची ओरड नागरिक करीत आहेत. परिणामी, गोंदिया जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी लक्ष देऊन देवरी तालुक्यावरील अन्याय दूर करतील का? असा प्रश्न देवरीवासियांनी प्रशासनाला केला आहे.

सविस्तर असे की, देवरी पंचायत समितीमध्ये ५४ ग्रामपंचायती अंतर्गत सुमारे १०७ गावांचा समावेश आहे. या सर्व ग्रामपंचायतीचा प्रशासकीय डोलारा सांभाळण्यासाठी देवरी पंचायत समितीमध्ये विस्तार अधिकारी (पंचायत) यांची दोन पदे मंजूर आहेत. या पदांवर श्री पराते आणि श्री झामरे कार्यरत आहेत. याउलट सालेकसा पंचायत समिती मध्ये ४० ग्रामपंचायतींमध्ये सुमारे ८० गावांचा समावेश आहे. या ग्रामपंचायतींचा प्रशासकीय डोलारा सांभाळण्यासाठी सालेकसा येथे सुद्धा विस्तार अधिकारी यांचे २ पदे मंजूर आहे परंतु, सालेकसा येथील एका विस्तार अधिकाऱ्याचे स्थानांतरण झाल्याने तेथील एक पद रिक्त झाले. नेमकी हीच बाब हेरून अधिकारी-पदाधिकारी यांनी ठरवून देवरी येथील एका विस्तार अधिकाऱ्याला सालेकसा येथे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले. त्यामुळे देवरी पंचायत समितीमधला कामांचा ताण हा एकाच विस्तार अधिकाऱ्यांच्या माथी आला. त्यावर उपाय म्हणून स्थानिक प्रशासनाने एका आरोग्य विस्तार अधिकाऱ्याला रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवून प्रशासकीय सोय करून घेतली. मात्र, याचा फटका देवरी पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतींच्या विकास कामांवर चांगला पडलेला दिसत आहे. आरोग्य विभागाच्या विस्तार अधिकाऱ्याला पंचायत विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याने आरोग्य आणि पंचायत या दोन्ही विभागातील विकासकामे वेळेवर होत नसल्याचे तालुक्यातील सरपंचांचे म्हणणे आहे. परिणामी, देवरी सारख्या अतिदुर्गम, आदिवासी आणि मागास तालुक्यातील विकास कामे मनमर्जीपणे चालवू पाहणा?यांचे चांगलेच फावत आहे.

सद्यःस्थितीमध्ये माहे जुलै महिन्यात झालेल्या जिपच्या पदोन्नतीच्या यादीतून सालेकसा पंस मधील नियमित विस्तार अधिकारी म्हणून जी.जी.मुनिश्वर हे रूजू झाले असताना देवरी पंचायत समितीचे सालेकसा येथे प्रतिनियुक्तीवर असलेले श्री पराते यांना देवरी येथे परत पाठविणे अपेक्षित होते. परंतु, या प्रकरणात काही लोकांचे हितसंबंध गुंतले असल्याने सालेकसा गटविकास अधिकारी यांनी श्री पराते यांना कार्यमुक्त केले नाही तथा देवरी गटविकास अधिकारी यांनी रिक्त पद असताना प्रतिनियुक्तीवर असलेले आपले अधिनस्त अधिकारी यांनी परत बोलविण्याची कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे प्रशासकीय वर्तुळात बोलले जात आहे.

एकतर देवरी सारख्या मागास भागातील अधिका?याची प्रतिनियुक्ती करणे संयुक्तीक नसताना ती करणे आणि प्रतिनियुक्तीच्या

### तालुकावासियांचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सवाल

जागी नियमित अधिकारी दिले असताना प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्याला त्याच्या मूळ आस्थापनेच्या जागी परत न पाठविण्यामागे कोणते गौडबंगाल आहे, हे कळायला मार्ग नाही. प्रशासनाच्या या ढिसाळ नियोजनामुळे शासनावर वेतनाचा भूर्दंड तर बसत आहे.

शिवाय मूळ ठिकाणी पद रिक्त ठेवून त्या भागातील जनतेला वेठीस धरण्याचे कारण काय? असा प्रश्न नागरिकांनी जिल्हा परिषद प्रशासनाला केला आहे. गोंदिया जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी या प्रकरणी लक्ष देवून देवरी पंचायत समितीवरील अन्याय दूर करतील, अशी आशा सुद्धा देवरीच्या नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# खा.पटेल १४ ऑगष्टला गोंदियात, दुसऱ्यांदा डीपीडीसी बैठकीला राहणार हजर

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल पटेल गोंदिया तालुक्याच्या दौऱ्यावर असून दि.१४ ऑगष्ट २०२४ बुधवारला सकाळी ११ वाजता गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.विशेष म्हणजे राज्यातील या सरकारच्या कार्यकाळात खा.पटेल हे दुसऱ्यांदा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.यापुर्वी महाविकास आघाडीची सरकार असतांना तत्कालीन पालकमंत्री अनिल देशमुख यांच्यासोबत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला हजर होते.



दुपारी ०१.३० वाजता बाजार चौक नवेगाव ता. गोंदिया येथे कार्यकर्ता बैठक,दुपारी ०३.३० वाजता मयुर लॉन, कटंगीकला येथे महिला मेळाव्याला उपस्थित राहून महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व संबोधित करणार आहेत. उपरोक्त कार्यक्रमांना खासदार प्रफुल पटेल यांच्या सोबत तालुक्यातील वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी उपरोक्त कार्यक्रमांना पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने केले आहे.

# बनावट बिड्यांची विक्री करणाऱ्यावर कारवाई

**गोंदिया**-शहरातील पुनाटोली येथे अधिकृत बिडी कंपनीच्या नावाचा, ब्रॅण्ड व ट्रेड मार्कचा वापर करून बनावट बिड्या, बिड्यांचे कट्टे, पुडे तयार करुन विक्री करणाऱ्यावर कारवाई करुन २८ हजार ५०० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई ११ ऑगस्ट रोजी भारत प्रा.लि. मंगलोरचे निरीक्षक अधिकारी व रामनगर पोलिसांनी संयुक्तरित्या केली.भारत प्रा.लि.चे निरीक्षक अधिकारी हरगोविंदसिंग लक्ष्मणसिंग राठोड (४६ रा.दिबकई उत्तरप्रदेश) यांच्या तक्रारीवरुन पुनाटोली येथे आरोपी माणिकलाल बोदलू पानतवणे (५८) यांच्याविरुध्द कारवाई करीत रामनगर पोलिसांनी आरोपीच्या घरावर धाड टाकली.



साप्ताहिक बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक
http://berartimes.com
बुधवार,दि.१४ ऑगस्ट २०२४


## संपादकीय

### दलित वस्त्या शासकीय योजनांपासून वंचित

महाराष्ट्र राज्यातील दलित वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरवून तेथील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सन १९७४ पासून दलित वस्ती सुधार योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या नावात बदल करून सध्या ही योजना अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या नावाने राबवली जात आहे. राज्यातील दलित वस्त्यांमध्ये ही योजना राबविली गेली तरी आज बऱ्याच गावातील दलित वस्त्यांकडे पाहिल्यावर या वस्त्या आजही शासकीय योजनांपासून वंचित आहेत असेच म्हणावे लागेल. सध्या आपल्या राज्याला समाज कल्याण मंत्रीच नाही ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याची शोकांतिका म्हणावी लागेल. मग सांगा राज्यातील दलित समाजाचे कल्याण होणार कसे? या प्रश्नाचा विचार राज्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी करणे गरजेचे आहे.

आपल्या राज्यातील दलित समाजाचा विकास होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सन १९९९ पासून रुपये ५ लाख अनुदान देण्यात येत होते. त्यानंतर १४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे रुपये १० लाख अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ५ डिसेंबर २०११ रोजी घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात रुपये २ लाख ते रुपये २० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येणार होते. राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार करता वाडीत १० ते २५ लोकसंख्या असेल, तर रुपये २ लाख, २६ ते ५० लोकसंख्या असल्यास रुपये ५ लाख, ५१ ते १०० लोकसंख्या असल्यास रुपये ८ लाख, १०१ ते १५०, १५१ ते ३०० आणि ३०१ च्या पुढे अनुक्रमे १२, १५ आणि २० लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कोकणातील ग्रामीण भागातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २,५५,५५३ तर राज्यातील एकूण ग्रामीण भागातील लोकसंख्या ७४,९४,८१९ होती.

दलित वस्ती सुधार योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्तीचा सर्वांगीण विकास करणे होय. मात्र काही दलित वस्त्या सोडल्या तर आजही कित्येक दलित वस्त्या शासकीय योजनांपासून वंचित आहेत असेच म्हणावे लागेल. यातील कित्येक नागरिक शहरात तसेच इतर गावांमध्ये जाऊन स्थायिक झालेले आहेत.

दलित वस्त्यांचा विचार करता दलित वस्त्या गावकुसाबाहेर असल्याने गावातील मुख्य रस्ता ते दलित वस्ती असा रस्ता असला पाहिजे. त्याला दोन्ही बाजूने गटार असायला हवे. पाणीपुरवठा, वीज पुरवठा, समाज मंदिर, विहीर, स्मशानभूमी, रस्त्याचे डांबरीकरण करणे, उघड्या विहिरीवर कठळे बांधणे, वस्तीच्या बाजूला नदी असल्यास संरक्षण भिंत बांधणे, वस्तीत जाताना नाला असल्यास नाल्यावर पूल बांधण्यात यावे. विहीर दुरुस्ती तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी सोयी–सुविधा, पाण्याची टाकी दुरुस्त करणे, सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या व शौचालय बांधणे, रस्त्याच्या बाजूला विजेचे दिवे लावणे, अंगणवाडी सुरू करणे, बगीचे तयार करणे, बसण्यासाठी बाक ठेवणे, खेळाचे साहित्य देणे, समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र, दुकाने अशी अनेक सार्वजनिक हिताची कामे केली जातात. तसा प्रस्ताव तयार करून ग्रामपंचायतीमार्फत जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाकडे पाठविण्यात येतो. मी महाविद्यालयात असताना विहीर चोरीला गेली? रस्ता चोरीला गेला? अशा बातम्या वाचायला मिळत असत. मात्र नेमके काय झाले याची कल्पना येत नसे. नंतर चौकशी केल्यावर लक्षात यायचे की, कोणत्याही प्रकारचे काम न करता कागदोपत्री शासकीय योजना राबवून अनुदान लाटले गेले आहे. किती दुर्दैव राज्याचे म्हणावे लागेल. अशा वेळी योग्य ती कायदेशीरपणे कारवाई होणे आवश्यक आहे. तेव्हा शासकीय अनुदान लाटणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई झाली असती, तर आज नवीन संसदेमध्ये अधिवेशन चालू असताना विरोधकांना नीट म्हणण्याची वेळ आली नसती. तेव्हा कोणत्याही शासकीय योजनांची नीट अंमलबजावणी केली जाते का याचे वर्षाच्या शेवटी मूल्यमापन होणे गरजेचे असते. झाले असते तर प्रशासकीय परीक्षा सुद्धा पारदर्शक झाल्या असत्या. हे केवळ दलित वस्त्यांसाठी मारक नाही तर देशाच्या विकासासाठी घातक आहे.

आज दलित वस्त्यांच्या विकासासाठी अनेक योजना आहेत. मात्र त्या संविधानिक चाकोरीतून राबविल्या जात नाहीत. इतके शासकीय अनुदान असून सुद्धा आजही दलित वस्तीतील राहणाऱ्या नागरिकांना आपल्याला हक्काचे पाणी मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करावे लागते. गावात स्मशानभूमी असून सुद्धा दलितांची प्रेते गावचे समजले जाणारे वतनदार जाळायला देत नाहीत. कित्येक गावातील दलित वस्तीत जाण्यासाठी रस्ता नाही. देवळामध्ये आजही चार बाय चारची जागा मग सांगा गावची ग्रामपंचायत करते काय? जर असे प्रकार गावात होत असतील तर अशा गावांना शासकीय अनुदान देण्यात येऊ नये. योग्य ती कायदेशीरपणे कारवाई होणे आवश्यक आहे. म्हणजे गावातील दलित वस्तीत राबविण्यात येणाऱ्या योजना कायदेशीरपणे राबविण्यात येतील. जर योजना राबविण्यात टाळाटाळ केली जात असेल किंवा शासकीय योजनांचे प्रस्ताव तयार करून पाठविले जात नसतील तर अशा गावच्या ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत. तेव्हा दलित वस्त्या सुधारणा अंतर्गत योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास राज्यातील दलित वस्त्यांचा विकास होण्याला वेळ लागणार नाही. त्यासाठी प्रत्येक वर्षी गावातील दलित वस्तीत ज्या योजना राबविल्या गेल्या असतील त्याचे शासकीय अधिकारी यांच्यामार्फत मूल्यमापन होणे गरजेचे आहे. तरच दलित वस्त्यांचा विकास होईल.

# तिकीट न देणाऱ्या ७५ एसटी वाहकांवर कारवाई

**गोंदिया:** एसटी महामंडळाच्या बरेच वाहक आर्थिक लोभापोटी प्रवाशांकडून तिकीटाचे पैसे घेत नाही. परिणामी महामंडळाला मोठा फ़टका बसतो. त्यामुळे महामंडळाकडून अशा वाहकांवर कारवाई करण्यात येते. यातंर्गत मागील सहा महिन्या भंडारा विभागात प्रवाशांकडून पैसे घेऊन तिकीट न देणाऱ्या ७५ वाहकांचे प्रकरण सध्या चौकशीत आहे. गत अनेक वर्षांपासून विभागातील काही आगारातील वाहत हे एकाच मार्गावर सेवा देत आहेत. अशा व अन्य मार्गावरील वाहक स्वतःच्या आर्थिक लाभासाठी प्रवाशांकडून तिकीटाचे पैसे घेऊनही तिकीट देत नसल्याच्या अनेक प्रकरण समोर आले आहे. यात महामंडळाचे मोठे नुकसान होत आहे. यावर आळा घालण्याकरिता महामंडळाच्या तपासणी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून वे–ळोवेळी धडक कारवाई केली जाते.

तसेच कारवाई करण्यात येते. यातंर्गत भंडारा विभागातंर्गत मागील सहा महिन्यात प्रवाशांकडून पैस घेऊनही तिकीट न देणाऱ्या ७५

**विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह पैसे घेऊन तिकीट न देणाऱ्या, तसेच निष्काळजी करत पैसे व तिकीटही न देणे अशांवर भरारी पथकाची नजर असते. मागील सात महिन्यात अशा ७५ वाहकांचे प्रकरण चौकशीत असून १६ प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.**

**शीतल सिरसाड, विभागीय वाहतूक अधिकारी, भंडारा**

वाहकांचे प्रकरण चौकशी आहे. यात प्रवाशांकडून पैसे घेऊन तिकीट न देणाऱ्या २५ व तिकीटाही दिले नाही अशा ५० वाहकांच्या प्रकरणचा समावेश आहे. नियमानुसार या वाहकांवर कारवाई केली जात असून तिकीटाच्या रक्कमेसह दंडही वसुली केला जातो. तसेच विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर भरारी पथकाद्वरे कारवाई केली जाते. अशा प्रवाशांकडून तिकीटाची रक्कम व दंड वसुली केला जातो. यातंर्गत गत सहा महिन्यात १६० प्रवाशांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ८ हजार ८८८ रुपये प्रवास भाडे व दंड वसूल करण्यात आला आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# पलटवार करण्याची वेळ आली आहे....!!


क्रांती प्रतिक्रांतीची लढाई ही प्राचीन काळापासून सुरू आहे. आजच्या काळातही तो लढा सुरू आहे...!!

प्रत्येक कालखंडात जी विचारधारा आपले ध्येय साध्य करण्यासाठी निकराने लढते ती विचारधारा त्या त्या काळात यशस्वी ठरते...!!

आज प्रतिक्रांती मुजोर झाली आहे. त्याचे कारण १९५० मध्ये रुजू होणाऱ्या भारतीय संविधानाने समतेचा आग्रह धरला आणि ही समता आपल्या साम्राज्यासाठी धोकादायक आहे हे इथल्या मुठभर सवर्णांनी हेरले. त्याच दिवसापासून संविधान संपवण्यासाठी मुठभर मनुवादी कार्यरत झाले. त्यांची संख्या कमी असल्याने ते समोरासमोरची लढाई लढतं नाहीत. ते छूप्या पद्धतीने लढतात. संविधान संपवण्यासाठी सवर्णांनी बुरखे पांघरले कुणी, सेक्युलर झाला. कुणी पुरोगामी, कुणी डावा, कुणी ऊजवा, कुणी समाजवादी तर कुणी लोकशाहीवादी. प्रत्येकाचे धेय्य मात्र एकच संविधान संपविणे...!!

सवर्णांनी बुरखे पांघरूण मोक्याच्या जागा काबीज केल्या आणि मग एका एका वाराने भारतीय संविधानाला नामशेष करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे...!!

भारतीय संविधानातील आरक्षणाच्या तत्वाची मोडतोड करायला सुरुवात झाली आहे. राज्यघटनेत कुठेही आरक्षण ५०% असावे असे नमूद नसतांनाही सवर्णांनी तसा निर्णय कोर्टाच्या तोंडी देऊन लागू करून घेतला. आणि उर्वरित ५०% जागा आपल्या सवर्ण समूहासाठी राखीव करुन घेतल्या....!!



ओबीसी समुहाचे आरक्षण संपवण्यासाठी क्रिमिलेअर आणून नंतर इम्पेरिकल डेटा चा आग्रह धरून ओबीसी आरक्षणाला स्थगिती दिली. आणि आता एस. सी. एस. टी. आर–क्षणाचे वर्गीकरण करून एस. सी. एस. टी चे आरक्षण संपवण्याचं षडयंत्र यशस्वी करण्यासाठी सरसावले आहेत...!!

सवर्ण वारावर वार करीत आहेत आणि क्रांती दर्शी छावणी सामसूम असेल तर संविधान वाचणार कसे.??

ही लढाई आहे. लढा लढावा ला–गतो. वाराला पलटवार केला तरच तुमची धडगत आहे. नाही तर आपणं सपशेल पराभूत झा–लेले असु...!!

राजकीय पातळीवर ब्राम्हणी नेतृत्व असलेल्या किंवा सवर्ण नेतृत्व असलेल्या राजकीय पक्षाकडून आरक्षण बचाव लढाई लढता येणार नाही.मृगजळाच्या पाठिमागे लागू नये...!!

क्रांतीदर्शी समुहाला यशस्वी होण्यासाठी स्वबळावर निकराने लढणे अत्यावश्यक आहे. आरक्षणवादी समुहाची संख्या ओबीसी + एस.सी.+ एस. टी. ५४+१५+७= ७६% आहे. एकत्र येऊन ३% सोबतं लढायचं आहे...!!

क्रांती दर्शी छावणी कडे बहुमत आहे. शत्रू अल्पसंख्य आहे. त्याला परास्त करण्यासाठी पलटवार करण्याची नितांत गरज आहे...!!

धुर्त सवर्णांनी आरक्षणावर गदा येईल असे वार करायला सुरुवात केली आहे. आणि ते विजयी अविर्भावात वावरत आहेत आणि म्हणून आरक्षणवादी समूहाने पलटवार केला पाहिजे....!!

आरक्षणवादी समूहाने रस्त्यावर आंदोलन केले पाहिजे. आणि खडसावून जाब विचारला पाहिजे.

३% वाले प्रशासनातील ९०% जागांवर कोणत्या सुत्राने हक्कदार झाले..?

न्याय पालिकेतील कॉलेजिअम सिस्टम बंद झाली पाहिजे

आरक्षणवादी समुहाच्या आंदोलनातील मागण्या पाहून आणि ऐकून सवर्णांच्या लक्षात आले पाहिजे की, आता फ़ार काळ आपणं आरक्षणवादी समूहाला मुर्ख बनवू शकतं नाही..!!

सवर्णांच्या लबाडीचा पर्दाफ़ाश करण्या बरोबरच समतेच्या तत्वानुसार आणि न्याय भूमिकेतून आरक्षणाची गरज अधोरेखित करण्याची आवश्यकता आहे...!!

क्रांती दर्शी छावणी कडून जोरदार पलटवार करण्याची गरज निर्माण झाली आहे...!!

**जयभीम.**

**भास्कर भोजने**

# मान्यता रद्द शिक्षकांचे नियमबाह्य वेतन काढून शासनाच्या तिजोरीची लूट

## नियमबाह्य पंधरा शिक्षकांची मान्यता रद्द होऊनही जिल्हा परिषद प्रशासन न्यायालयाची दिशाभूल करीत असल्याचे प्रकरण

**गोंदिया:**–गोंदिया जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग मधील तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी सुनील मांढरे यांनी कोरोना कालावधीमध्ये जिल्ह्यात नियमबाह्य व बेकायदेशीर शिक्षक मान्यता २०१७ पासून २०२० मध्ये दिल्या होत्या.

सदर मान्यता ह्या नियमबाह्य बेकादेशीर असल्यामुळे शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी नियुक्तीस मान्यता रद्द केल्या. त्यामुळे व्यतित होऊन नुकतीच मान्यता रद्द झालेल्या कर्मचा?यांनी उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल केल्या. शिक्षण–उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी मान्यता रद्द करतानी संबंधित कर्मचा?यांना सखोल कारणे दाखवा नोटीस न दिल्यामुळे मान्यता रद्द करण्याचे शिक्षण उपसंचालकाचे आदेश रद्द करून एका महिन्याचे आत सहसंचालक शिक्षण विभाग पुणे यांनी सुनावणी घ्यावी असे आदेश पारित केले. एका महिन्याच्या सुनावणी घेतली नाही तर संबंधित कर्माचाऱ्यांचे वेतन नियमित सुरू करावे असे देखील आदेश दिले. परंतु सहसंचालक शिक्षण पुणे यांनी दिलेल्या मुदतीच्या आत सुनावणी न घेतल्यामुळे संबंधित कर्मचारी यांना वेतन देण्याचे आदेश देण्यात आले. परंतु नुकतेच एक जुलै २०२४ ला सहसंचालक शिक्षण पुणे

**शिक्षणाधिकारी माध्यमिक गोंदिया यांच्या सूचनेप्रमाणे वेतन देयक मंजूर करण्यात आले. न्यायालयाचे आदेश आले की बंद करून कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती वेतन अधीक्षक श्री. जिभाकाटे यांनी दिले आहे.**

**वेतन अधीक्षक गोंदिया**

यांनी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांचे आदेश कायम करून सर्वच्या सर्व सोळा शिक्षकांच्या मान्यता रद्द केले आहेत.जिल्हा परिषद माध्यमिक विभागाने नियमबाह्य पद्धतीने शिक्षक पद मान्यता दिलेले प्रस्तावच रद्द केल्याने त्यांच्या वेतन तात्काळ बंद करून याबाबत न्यायालयाला माहिती देणे ग्राह्य असून सुध्दा उलट मान्यता रद्द झालेल्या शिक्षकांचे वेतन काढून शासनाच्या तीजोरीची लूट करण्याचे धाडस जिल्हा परिषद माध्यमिक विभाग अधिकारी व वेतन पथकाने केले आहे.याविरुद्ध आता शिक्षक मान्यता रद्द झालेल्या प्रकरणात मान्यता देणा?या अधिकारी विरुद्धच फ़ौजदारी खटला दाखल करून दिलेल्या वेतनाची वसुली करावी अशी मागणी माजी आमदार ना. गो. गाणार यांनी केले आहे.तर विद्यमान आमदार सुधाकर आडबले मात्र या प्रकरणात मौन बाळगूण आहेत.

# अदानी फाउंडेशनच्या सामुदायिक आरोग्य सेवेचा ४२ हजारापेक्षा जास्त नागरिकांना लाभ

**तिरोडा:**– अदानी फ़ाउंडेशन तिरोडाच्या सामुदायिक आरोग्य या कार्यक्रमांतर्गत मागील वर्षापासून तर आजपर्यंत तिरोडा तालुक्यातील एकूण ४२ हजार १९३ नागरिकांना आरोग्य से–वेचा लाभ मयंक दोशी, अदानी पावर प्रमुख तिरोडा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.



यामध्ये अदानी फ़ाउंडेशन द्वारा चालविल्या जाणाऱ्या मोबाईल हेल्थकेअर युनिट च्या माध्यमातून तालुक्यातील २५ गावांमधील ३६४५४ बालके, स्त्री ,पुरुष,वृद्ध यांना मोफ़त तपासणी करून मोफ़त औषध सेवा देण्यात आली. तर जनरल हेल्थ चेक अप कॅम्पच्या माध्यमातून एकूण १६५२ रुग्णांना मोफ़त सेवा देण्यात आली.

यासोबतच अदानी फ़ाउंडेशन तिरोडा द्वारा मल्टीस्पेशालिटी आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन तालुक्यातील १२ गावांमध्ये केले होते या शिबिरामध्ये सामान्य रुग्ण तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, बालरोगतज्ञ, नेत्ररोग तज्ञ ,स्त्री रोग तज्ञ यासारख्या तज्ञ डॉक्टरांद्वारे ३७७६ रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी रीजनल कॅन्सर हॉस्पिटल नागपूर व अदानी फ़ाउंडेशन तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने गुमाधावडा, भिवापूर, एकोडी, दांडेगाव या चार गावांमध्ये मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचा लाभ ३११ रुग्णांनी घेऊन कर्करोगाचे प्राथमिक लक्षण आढळून आलेल्या रुग्णांना पुढील उपचाराकरिता राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटल नागपूर येथे पाठविण्यात आले.

यावर्षी २०२४ मध्ये सुद्धा अदानी फ़ाउंडेशन तिरोडा च्या माध्यमातून आरोग्य सेवेचे विविध उपक्रम राबवून जास्तीत जास्त नागरिकांना मोफ़त आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी अदानी फ़ाउंडेशन प्रयत्न करेल असे अदानी फ़ाउंडेशन प्रमुख बिमुल पटेल यांनी सांगितले.या सर्व उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अदानी फ़ाउंडेशन चे कार्यक्रम अधिकारी स्वप्निल वाहने व व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संतपरंपरा आणि समतेची शिकवण

अखिल मानव उद्धारक विचार हे कालजयी असतात. विचारांचे मूल्ये काळानुरूप समाजाला उपयोगी पडतात हेच खरे! संतांनी समाजात रुजवलेले विचारही असेच मूल्याधिष्ठित असतात.

"माणूस द्या मज माणूस द्या हो,
भीक मागता प्रभू दिसला ।।"

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे हे कवण ऐकले की भरकटलेला माणूस भानावर आल्याविना राहत नाही. तुकडोजी महाराज यांनी सुमारे साठ वर्षांपूर्वी विविध समाजोद्धारक विषयांवर चिंतन मांडले. त्यांची मराठी व हिंदी भाषेत असलेली लोकप्रबोधक भजने, ग्रामगीता, विवाहोपयोगी मंगलाष्टके, जेवणावळीत म्हणतात ते उद्बोधक श्लोक आणि द्वैभाषिक भाषणे अशी विपुल साहित्य संपदा प्रसिद्ध आहे. त्यातून समाजोन्नतीचे विचार व मूल्ये त्यांनी प्रसृत केलीत. तथापि त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू माणूसच राहिला आहे. असा माणूस जो माणसावर प्रेम करणारा असेल. अशा माणसात ते साधूत्व आणि संतत्व शोधत. अशा माणसात त्यांना ईश्वर दिसत असे, आणि माणसाची सेवा करणे माणसामाणसांमध्ये प्रेम निर्माण होणे हीच ईश्वरभक्ती आणि हीच मानवता होय. माणुसकीला जपणाऱ्या अशा समाजाला मग लबाडी, थोतांड, दांभिकता याप–ासून मुक्ती मिळून; सचोटीने वास्तवाला भिडण्याचे सामर्थ्य येते. प्रामाणिक माणसाला आपले काम करत असतानाच देवाचे दर्शन घडते, उलट बेईमान माणसाने कितीही टाळकुटेपणा केला आणि मुर्तीपुढे मस्त घासले तरी त्याला देव दिसू शकत नाही.आणि म्हणून ईश्वर हा इतरत्र कुठेही नसून साक्षात सज्जन माणसातच वास करतो.

"तीर्थी धोंडापाणी,
देव रोकडा सज्जनी।"

हे सूत्र संतांनी दीर्घकाळ मांडून लोकप्रबोधन केले.


खरे म्हणजे संत तुकडोजी महाराजांनी मांडलेला हा विचार मानणारी संतांची दीर्घ परंपरा आहे. मानवनिर्मित विषमता ही माणसाच्या जीवावर उठणारी आहे वर्णभेद धर्मभेद जातीभेद लिंगभेद हे मानवाच्या विकासाच्या ज्या विविध ऐतिहासक टप्प्यावर निर्माण झाले, तेथे त्या टप्प्यांवर धूर्तांनी माणूसच दुय्यम ठरवला. तिथेच विषमताखोर विषवल्लीचे बीजारोपण होत गेले. उच्च–नीच भाव माणसाच्या मनात निर्माण करून उच्चजातस्वार्थी प्रवृत्तीने समाज पोखरून टाकला.

प्राणीमात्रात मानव सर्वश्रेष्ठ आहे खरा पण समाजमनावर कलम केलेली विषमता मानवतेसाठी कलंक ठरली आहे. त्यामुळे भेदभावाची पाळेमुळे खणून काढल्याशिवाय समाज प्रगत होणार नाही.

माणसाला उन्नत अवस्थेत पोहोचण्यासाठी संत माणसात देव शोधतात. माणसाबद्दल प्रेमभाव, हातात हात घेऊन समभाव, प्रतिष्ठेची वागणूक. घ्रुणा नाही. द्वेष नाही. सामान्य माणसाच्या या निरलस भावछटा माणसाशी समतेच्या दृष्टीने उपयुक्त ठराव्यात. असा विवेकी विचार मानवी व्यवहारात यावा, म्हणून एखादा भीक मागणारा सर्वहारा माणूसही प्रभू वाटला पाहिजे असे संतांचे वचन समाजाला अंतर्मुख करणारे आहे.

संतश्रेष्ठींनी समाजाला इतकी मौलिक शिकवण देऊन ठेवलेली असून आजही माणूस माणसाची हेळसांड करताना दिसतच आहे. अनेक ठिकाणी लहान मुलं, म्हातारे, अपंग अशी माणसं भीक मागताना दिसतात. त्यांना भीक मागणे आवडते किंवा ते फ़ार आनंदाने भीक मागतात असं अजिबात असण्याची शक्यता नसते. भीक मागणाऱ्यांची कित्येकदा प्रचंड नाचक्की होते. तरी अगतिकतेने, अपमान पचवत ते भीक मागत असतात. मानव सर्व प्राणिमात्रात बुद्धिमान आहे, त्याला भाषेची असलेली इतर प्राण्यांपेक्षा अद्वितीय खासबात, यामुळे त्याचं वेगळंपण निसर्गसृष्टीमध्ये दिसून येते. तरीही भीक मागण्याची विशिष्ट व्यक्तीवर अनैच्छिक आफत येते. खरंतर ही 'बला' विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेची देण होय. विषमतेमुळे निर्माण झालेले साधनसामग्रीचे असमान, अपुरे, कमी–अधिक वितरण,संधीची असमानता यामुळे भिकारी (गरिबी–दारिर्द्यसुद्धा) ही समस्या निर्माण झाली. भिकारी हे समाजाला लागलेली कीड आहे. अशा भिकाऱ्यांना चक्क गोळ्या घालून संपवले पाहिजे असे कधी कोणीतरी बरळत जातात. धडधाकट भिकारी दिसला की, काही कामधंदा का करत नाही असे फुकटचे सल्ले देणारेही काही कमी नाहीत. भिक मागणाऱ्या कच्च्या–बच्चांना तर टिंगल टवाळीने टोचून टाकून बोलत त्यांची मस्करी करणे असे प्रकार अवतीभवती नित्याने नजरेत





येत असतात. त्यांच्या पुनर्वसनाचा केवढा मोठा प्रश्न व्यवस्थेसमोर आ वासून उभा आहे? स्वातंत्र्यापश्चात पाऊणशे वर्षांच्या काळानंतरही आम्ही आमच्या देशवाशीयांचा बंधुभावाने हातात हात घेऊन त्यांना समानतेच्या पातळीवर आणू शकलेलो नाही, असा याचा अर्थ निघू शकेल. संतांनी मात्र अशा रंजल्या गांजल्यांना आपले मानून जनातच देव शोधला.

"जे का रंजले गांजले,
त्याशी म्हणे जो आपुले"

म्हणत विषमतेने ग्रस्त समाजमनावर मानवसेवेचे रोपण करण्याची केवढी अप्रतिम मानसोपचार पद्धती संतांनी अवलंबली म्हणावी!

वारकरी पंथ म्हणजे पंढरीची वारी– तीर्थयात्रा करणारा पंथ नसून तो प्रचलित व्यवस्थेवर (विषम वैदिक सूत्रावर) वार करून लोकांना मुक्ती देणारा पंथ होता. वारकरी पंथ म्हणजे विचाराने वार करणारे. धर्मशास्त्र विरुद्ध पुकारलेले वैचारिक युद्ध होय. वारकरी पंथाला मानणाऱ्या प्रामाणिक खऱ्या संतांनी वैदिक धर्मातील पुरोहितशाही व ईश्वरशाहीवर वार केले. पंडित पुरोहितांनी जेव्हा लोकांना देवळात जाऊन पूजापाठ करण्यासाठी प्रवृत्त केले, तीर्थयात्रेला जाण्यासाठी प्रेरित केले, दक्षिणांच्या माध्यमातून लुबाडणे सुरू केले, तेव्हा वारकरी पंथाला मानणाऱ्या संतांनी अभंगातून लोकांना जागृत केले. संत नामदेवांनी

'देव देव्हाऱ्यात नाही,
देव नाही तीर्थात।
तोची वसतो कष्टात,
तोची दिसतो परोपकारात।

अशी दांभिक धर्ममार्तंडांची कान उघाडणी केली."

तर,"तीर्थी धोंडा पाणी देव रोकड सज्जनी"

(प्रु.१३०–३१, सत्यशोधक समाज प्रबोधन–प्रबोधनकार अरविंद माळी)संत तुकारामांनी या अभंगातून सज्जनात ईश्वर वास करतो अशी महती अधोरेखित केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, "मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी...," "मंदिर मंदिर क्या घुमता है।
पहिले सेवा कर गरीबोंकी।"

अशाप्रकारे मूर्तीपूजा आणि देवळांपेक्षा मानवसेवेची महिमा संतांनी वर्णिलेली दिसते.

मग ईश्वर आणि धर्म मानायचा की नाही असा पेच सामान्य माणसाच्या मनात निर्माण होतो. त्यावर वारकरी पंथातील आपल्या संतांनी ईश्वर कसा मिळणार व धर्म कशाला म्हणायचे हेही सांगितले आहे.

रंजल्या गांजल्यांची सेवा करणे हे तुकोबांचे वचन जेवढे बोलके आहे तेवढेच परखड गाडगेबाबांचे खडे बोलही ऐकू येतात भुकेल्यांना अन्नदान, तहानलेल्यांना पाणी, निरक्षरांना शिक्षण द्या. उघड्या नागड्यांना कपडे द्या. हीच खरी पूजा आहे. संत नामदेवांनी तर,

भजा आत्मदेवा।
अखंडित सेवा।
करा त्याची।
मकोणाही जीवाचा
न घडो मत्सर।
मर्म परमेश्वर
पुजनाचे।फ अशा शब्दात द्वेष करणाऱ्या विषमतावाद्यांना चांगल्याच कानपिचक्या घेतल्या.

संत सावता माळी,

"कांदा मुळा भाजी।
अवघी विठाई माझी।"

म्हणत आराध्य दैवताचे अपारंपरिक रुप सांगतात.

तर साने गुरुजी,

मकुणां ना तुच्छ लेखावे,फ
मसर्व हीन अतिपतीत,
दीन पददलित,
आर्त अतिविकल

गांजलेल्यांना प्रेम अर्पण करणे म्हणजेच खरा धर्म होयफ असे म्हणतात.

सामान्य माणूस प्रेमाने, बंधुप्रितीने, जिव्हाळ्याने, आत्मीयतेने एकोप्याने, सहकार्याने, सहृदयतेने वागतो हा खरं तर धर्माचा सार असला पाहिजे. The day we find a great number of men and women with this psychology who cannot devote themselves to anything else than the suffering humanity, that day shall inaugurate the era of liberty.(p.11, Why I am Atheist- Bhagat Singh) अर्थात, भगतसिंग देखील मानव–सेवा करणाऱ्यांची संख्या वाढेल त्या दिवसाला स्वातंत्र्ययुगाची सुरुवात मानतात.

अर्थात संत नब महामानवांनी मानवच केंद्रस्थानी मानून त्याचे दुःखनिवारण करणे, मानवाची सेवा करणे, हाच धर्म मानला, परोपकार, अस्पृश्यता उच्चाटन, जातीभेदाविरोधात एकोपा, सहभोजन, मानवसेवा, परमार्थ साधत माणसात देव शोधला. मनात उच्चनिच भेदाभेद न ठेवता सद्वर्तन, सदाचार करून सन्मार्गाने जगणे याला प्राधान्य दिले. मन परिवर्तनावर भर दिला.

मराठी संत आणि संतसाहित्य हे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या अभ्युदयाचा व्यासंग व्हावा, अशा लाखमोलाचे आहे. मराठी संतांनी तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत येथील जनजीवन व्यापून टाकले, भारून टाकले होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीमध्ये मराठी संतांचे योगदान तर अनन्यसाधारण आहे.

संतपरंपरा मानत असलेल्या या विचारप्रवाहाला हजारो वर्षांची प्रदीर्घ अशी समृद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी राहिलेली आहे. लोकायत, बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभाव इ.अवैदीक धर्म–पंथ आपापल्या मताचा जोरदार पुरस्कार करीत असताना अनेकदा त्यांना वैदिक परंपरावाद्यांचा प्रतिहल्ला जिव्हारी लागणारा ठरला. हेमाद्री पंडितासारख्या उच्चपदस्थ व्यक्तीने पुराणधर्माचे पुनरुज्जीवन करून कर्मकांडांचे अवडंबर हिरिरीने माजवित असल्याच्या पार्श्वभूमीवर संत आणि संत साहित्य महाराष्ट्राला ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी दीपस्तंभासारखे ठरते. सामाजिक सांस्कृतिक जीवनाच्या पेचप्रसंगातही धिरोदात्तपणे तोंड देण्याची कार्यपद्धती फ़लदायी ठरते. सर्व सामाजिक सांस्कृतिक व्यवहार वर्णनातीत जटिल बनला आहे. या जटीलतेची हळूवारपणे उकल करून आक्रस्ताळेपणाऐवजी आस्थेने, प्रेमानं परंपराशील समाजमनाचं नव्या युगसंदर्भाला अनुरूप प्रबोधन घडवायला हवं. ज्यांच्या जीवनक्रमात परिवर्तन घडवायचंय त्यांची टिंगल टवाळी करून त्यांची टर उडवण्याची भूमिका घेऊन त्यांना परिवर्तन सन्मुख बनवणं अवघड आहे. अशा भूमिकेमुळे अनेकदा ती माणसं परिवर्तनाच्या बाबतीतील स्वागतशीलता गमावून बसतात. अन अधिक कडवेपणाने त्याच परंपरेला चिकटतात. हे रा. चि. ढेरे (पृष्ठ ७९,श्री आनंदनायकी) यांचं मत लक्षात घेता संतचळवळीची आजच्या संदर्भातील कालसुसंगता अधिक स्पष्ट होते.

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणांना संत चळवळीने मशागत भूमी फलदायी ठरली. संतांनी समाजमनाची प्रबोधनातून केलेली मशागत सामाजिक सुधारणांचे बिजारोपण करण्यास उपयुक्त ठरली. त्यामुळे पुढील काळात अस्पृश्यता निवारण, स्त्री–शिक्षण, जातीभेद विरोध, उच्चजातवर्णवर्चस्व विरोधी लढे, शेतकरी कष्टकऱ्यांची लढाई, आदिवासींचे संघर्ष इ. धुमारे फुटू लागले. एकूणच वर्णजातीव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या विषमतेने होरपळून निघालेल्या दलित, आदिवासी, ओबीसी शेतकरी कष्टकरी अठरापगड जातींमध्ये अन्यायाविरोधात चीड निर्माण होण्याची मानसिकता तयार होऊ लागली.

सत्यशोधक चळवळीने तर तत्कालीन समाजमनाचा धागा पकडून या परिस्थितीला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवत महाराष्ट्रभर सत्यशोधक चळवळीचे जाळे विणले गेले. एका दैदिप्यमान सामाजिक लढ्याचा हा काळ होता, ज्यामुळे महाराष्ट्राचे संपूर्ण जनजीवन प्रभावित होऊन गेले. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अंगाने महाराष्ट्राला पुरोगामी बिरुदावली लागली ती या घटनाक्रमातून. त्यादृष्टीने सांस्कृतिक सामाजिक परिवर्तनवादी लढ्यातील धुरिणांनी पावलोपावली संत चळवळ आणि समतावादी शिकवण ध्यानात घेणे आवश्यक आहे.

**अनुज हुलके**

# शिक्षकच नाही, कसे घ्यायचे शिक्षण

## अवघड क्षेत्रातच गुरुजींची कमतरता, सालेकसा अर्जुनी मोरगावला सर्वाधिक फटका



**गोंदिया:** देवरी, सालेकसा आणि अर्जुनी मोरगाव या तालुक्यातील बहुतांश भाग अवजड क्षेत्रात मोडतो. जिल्हा परिषदेने जुलै महिन्यात शिक्षकांच्या बदल्या केल्या. मागेल त्या शिक्षकाला ती शाळा, असे धोरण राबविण्यात आले. परंतु शिक्षकांना खुश करण्याच्या नादात अनेक शाळा शिक्षकाविनाच आहेत. सालेकसा तालुक्यात तब्बल ८४, तर अर्जुनी मोरगाव तालुक्यात शिक्षकाची ६८ पदे रिक्त पडली. यामुळे शिक्षकच नाहीत, मग गरिबांच्या पोरांनी शिक्षण घ्यायचे तरी कसे? असे म्हणण्याची वेळ आली आहे.

सालेकसा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांअभावी शिक्षण कार्य पूर्णत: खोळंबले आहे. तरीसुद्धा गोंदिया जिल्हा परिषदेकडून सालेकसा तालुक्याला नवीन शिक्षक देण्यात दुर्लक्ष करण्यात येत आहे. कारण नुकतेच गोंदिया जिल्ह्यात नवीन शिक्षक रुजू झाले असून सालेकसा तालुक्याला एकुण १०१ शिक्षकांचे पद रिक्त असताना फक्त १७ नवीन शिक्षक देण्यात आले आहेत आणि तब्बल ८४ शिक्षकांची नितांत आवश्यकता आहे. जर या शिक्षकांची पूर्तता झाली नाही तर खोळंबलेली शिक्षण व्यवस्था आणखी ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सालेकसा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ११२ शाळा आहेत. एकूण दहा केंद्रांच्या विचार केला तर बिजेपार केंद्रात २८ पद मंजूर असून फक्त २१ शिक्षक कार्यरत आहेत. आणि सात पद रिक्त आहेत. दरेकसा केंद्रात ३४ शिक्षकांचे पद मंजूर असून २५ शिक्षक आहेत आणि नऊ पदे रिक्त आहेत. झालीया केंद्रात एकूण ४६ शिक्षकांचे पद मंजूर असून, ३९ शिक्षक कार्यरत आहेत. तर सात पदे रिक्त आहेत. कोटरा केंद्रात २९ शिक्षकांचे पद मंजूर असून २१ शिक्षक कार्यरत आहेत आणि आठ पद रिक्त आहेत. रामाटोला केंद्रात ४२ शिक्षकांची पद मंजूर असून फक्त २८ शिक्षक कार्यरत आहेत. तर १४ पद रिक्त पडलेली आहे. रोंढा केंद्रात ४० पदे मंजूर असून ३२ शिक्षक कार्यरत आहेत. आणि ८ पदे रिक्त आहेत. साखरीटोला केंद्रात २४ शिक्षकांचे पद मंजूर आहेत आणि २१ शिक्षक कार्यरत आहेत. तीन पदे रिक्त आहेत. सालेकसा केंद्रात ४५ पदे मंजूर असून ३७ शिक्षक कार्यरत आहेत आणि सहा पदे रिक्त आहेत. सोनपुरी केंद्रात ५६ शिक्षकांचे पद मंजूर असून ४४ शिक्षक कार्यरत आहेत. आणि बारा पदे रिक्त आहेत. आणि तिरखेडी केंद्रात ३० शिक्षकांचे पद मंजूर असून २० शिक्षक कार्यरत आहेत. एकूण दहा शैक्षणिक केंद्रामध्ये ३७२ शिक्षकांचे पद मंजूर असून फक्त २८८ शिक्षक कार्यरत आहेत. तर तब्बल ८४ पद रिक्त आहेत. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ६८ शिक्षकांची पदे रिक्त पडली आहेत. त्यातही वर्ग १ ते ५ च्या ३२ शाळेत तर फक्त एकच शिक्षक कार्यरत तर ३ शाळा शिक्षकाविना आहेत. अर्जुनी मोरगाव पंचायत समिती अंतर्गत २००२३-२४ च्या संच मान्यतेनुसार उच्च श्रेणी मुख्याध्यापक १७, भाषा विषय ४३, गणित-विज्ञान ४४, सामाजिक शास्त्र ४, प्राथमिक शिक्षक ३२८ अशी एकूण ४३२ पदे मंजूर असून ३६७ पदे सध्या कार्यरत आहेत. तर ६८ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये भाषा विषयाचे १२, गणित-विज्ञान २, सामाजिक शास्त्र २, प्राथमिक शिक्षकांच्या ५२ पदांचा समावेश आहे. शिक्षण सभापतीच्यांच तालुक्यातच जि.प. शाळा शिक्षकाविना असल्याने इतर तालुक्यातील जि.प. शाळांची काय परिस्थिती असेल, हे सांगणे कठीणच आहे.

### आठ शाळेत ५६ वर्ग, शिक्षक मात्र १८

**सालेकसा तालुक्यात अनेक शाळा आहेत की त्या ठिकाणी एका ते सात वर्ग असुन सुद्धा एकच शिक्षक दोनच शिक्षक किं तीन शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे शिक्षकांना प्रत्येक वर्गाला अध्यापन करणे तर दूरच राहिले. त्यांना सांभाळणे ही कठीण होत आहे. तालुक्यात निंबा, गल्लटोला, बाम्हणी आण पाऊलदौना या चार शाळा अशा आहेत. त्या ठिकाणी एक ते सात पर्यंत फक्त दोन शिक्षक कार्यरत आहेत. हलबीटोला रामाटोला आणि बाुकसर्रा या ठिकाणी एक ते सात पर्यंत फक्त तीन-तीन शिक्षक कार्यरत आहे. पांढरी येथे एक शाळा आशी आहे त्या ठिकाणी एक ते सातवी पर्यंत वर्ग असून सुद्धा एकच शिक्षक कार्यरत आहेत. तालुक्यात अशा एकूण आठ शाळा असे आहेत की, त्याचे एकंदरीत ५६ वर्ग आहेत. मात्र त्यामागे फक्त १८ शिक्षक कार्यरत आहेत. सुकाटोला प्राथमिक शाळा अशी आहे की त्या शाळेत आजघडीला एकही शिक्षक कार्यरत नाही आणि उधारीच्या शिक्षकावर चालत आहे. अनेक वेळा शाळा बंद पडली दिसते.**

### नवीन शिक्षकांची सालेकसाकडे पाठ

**१०१ शिक्षकांची गरज असताना फक्त १७ शिक्षक मिळाले आहेत. याची मुख्य कारण म्हणजे सालेकसा तालुका हा नक्षलग्रस्त अतिदुर्गण भाग असलेला तालुका असून या तालुक्यात कोणीही कर्मचारी स्वखुशीने रुजू होण्यास तयार नसतो. शिक्षकांच्या बाबतीत तसेच घडत असून नवीन आलेल्या शिक्षकांनी सोयीच्या ठरणाऱ्या गोंदिया तालुका तिरोडा तालुका आणि इतर सोयीस्कर तालुक्यांना प्रथम पसंती देऊन त्या तालुक्यात रुजू झाले आहेत. परंतु सालेकसा कडे पाठ फिरवली आहे.**

**शिक्षक भरती रखडल्यामुळे आणि शिक्षक सेवानिवृत्त होत असल्यामुळे शिक्षकांच्या रिक्त पदांचा अनुशेष वाढला आहे, शिक्षकांचा ताळमेळ बसविताना जिल्हा परिषदेला देखील अडचण येत आहे. याची माहिती शासनाला कळविण्यात आली आहे. ज्या ठिकाणी शिक्षक कमी आहेत अशा शााळांत स्वयंसेवक नेमण्याची मंजूरी जिल्हा परिषदेने दिली आहेत. पुन्हा स्वयंसेवक लागल्यास नेमण्याची जिल्हा परिषदेची तयारी आहे.**

**पंकज रहांगडाले, अध्यक्ष**
**जि.प.गोंदिया**

# विधानसभेपुर्वी कुणाचा प्रवेश अन् कोण जाणार बाहेर!

## काँग्रेसच्या मेळाव्याकडे सर्वच पक्षांच्या नजरा, मतदारसंघातील समीकरण बदलणार

**गोंदिया:** निवडणूक लोकसभेची असो वा विधानसभेची यादरम्यान सर्वच राजकीय पक्षात इनकमिंग आणि आऊट गोईंग सुरु होत असते. असेच चित्र सध्या गोंदिया जिल्ह्यात निर्माण झाले आहे. विधानसभेत उमेदवारी मिळण्याची शक्यता कमी असल्याने काही दिग्गज नेते भारतीय जनता पक्ष सोडून काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे कोण जाणार याची सध्या जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात चर्चा आहे.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला जिल्ह्यात मिळालेल्या यशामुळे या पक्षाच्या पदाधिकारी नेत्यांमध्ये उत्साह आहे. त्यामुळे विधानसभेला गोंदिया, अर्जुनी-मोरगाव, आमगाव व तिरोडा या चारही मतदारसंघात तगडे उमेदवार देण्याची तयारी काँग्रेसने सुरु केली आहे. यासाठी भाजपच्या जिल्ह्यातील काही नाराज नेत्यांशी संपर्क वाढविला आहे. यात दोन माजी आमदार आणि काही पदाधिकारी येत्या २१ ऑगस्ट रोजी गोंदिया येथे काँग्रेस पक्षातर्फे आयोजित मेळाव्यात पक्ष प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. हा पक्ष प्रवेश सोहळा भव्य दिव्य व्हावा आणि याचा विधानसभा निवडणुकीत फायदा करुन घेण्यासाठी काँग्रेस पक्षाने तयारी सुरु केली आहे. यासाठी काँग्रेस पक्षाच्या दिल्ली आणि राज्यातील नेत्यांना या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आल्याची माहिती आहे. तर २१ ऑगस्ट रोजी कोण-कोण काँग्रेस पक्षात प्रवेश करतो याला घेऊन जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले, याचा सर्व परिणाम दोन महिन्याची होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच सर्वच राजकीय पक्षांच्या नजरा या मेळाव्याकडे लागल्या आहेत.



### भाजपकडून घेतला जातोय कानोसा

**गोंदिया मतदारसंघातील राजकारणात भाजपात थोडी धुसफूस आहे. माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी २७ जुलैच्या कार्यक्रमात स्पष्टपणे बोलून सुद्धा दाखविले होते तर काही पदाधिकारी नाराज असून ते यावर उघडपणे बोलणे टाळत आहेत. त्यामुळे आता भाजपकडून अशा नाराज नेत्यांचा कानोसा घेतला जात आहे. या नाराज पदाधिकाऱ्यांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुद्धा चर्चा करणार असल्याची भाजपच्या गोटात चर्चा आहे.**

### राष्ट्रवादी काँग्रेस अलर्ट मोडवर

**विधानसभा निवडणुकीपुर्वी जिल्ह्यात घडणाऱ्या घडामोडीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने सुद्धा बारीक नजर ठेवली आहे. गोंदिया विधानसभा मतदारसंघातून पक्षाचा उमेदवार देण्याची तयारी घेतली जात असून यासाठी माजी आमदार राजेंद्र जैन यांनी सध्या कंबर कसली आहे.**

# काँग्रेस पक्षाकडून ४४ उमेदवार इच्छूक

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीकरिता कधी नव्हे ते पहिल्यांदाच जिल्ह्यात काँग्रेसमध्ये इच्छुकांची गर्दी वाढू लागली आहे. काँग्रेसच्या वरिष्ठांनी जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील इच्छुकांकडून अर्ज मागविले होते. ४४ इच्छुकांचे अर्ज जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड यांनी मुंबई येथे हायकमांडकडे सुपूर्त केले.

येत्या काही महिन्यांत राज्याच्या विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यासाठी सर्वच पक्षांनी संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. काहींनी कार्यकर्ते आणि मतदारांच्या भेटीगाठी देखील सुरु केल्या. काही महिन्यांपुर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला चांगल्या जागा मिळाल्या. त्यामुळे काँग्रेसमध्ये आता तिकीट मागणाऱ्यांची गर्दी होवू लागली आहे. काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी इच्छुकांकडून अर्ज मागविले होते.

जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील ४४ इच्छुकांनी आपले अर्ज जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड यांच्याकडे मि केले. ते अर्ज बन्सोड यांनी मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे दिले. गोंदिया विधानसभा मतदार संघातून ६ अर्ज आले असून त्यात अमर वराडे, सुरेश चौरागडे, राजीक ठकरेले, अरुण गजभिये, अशोक गुप्ता, राजकुमार पटले, तिरोडा विधानसभा मतदार संघातून दिलीप बन्सोड, राधेलाल पटले, ॲड. टेकचंद कटरे, रमेश टेंभरे,ओमप्रकाश पटले, वनिता ठाकरे, परसराम कटरे, जगदीश येरोला, डॉ. जीतेंद्र कटरे, आमगाव-देवरी विधानसभामतदार संघासाठी १२ अज आले असून ॲड. दुष्यंत किरसान, राजकुमार पुराम, सावंत राऊत, मोतीलाल पोहिदे, दुर्गाप्रसाद कोकोडे, वासुदेव घरत, यशवंत मलये, वामन शेडमाके, डॉ. अनिल कुंभरे, नलेंज मरसकोले, सहसहराम कोरोटे, आशा उइके यांचा समावेश आहे.

### सर्वाछिक इच्छुक अर्जुनी मोरगावात

**अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदार संघातून १७ अर्ज आले असून त्यात दिलीप बन्सोड, अनिल मेश्राम, आनंदकुमार जांभुळकर, विजय खोब्रागडे, डॉ. भारत लाडे, अतुल बन्सोड, रविंद्रकुमार पंचभाई, प्रदीपकुमार गणवीर, अनिल दहिवले, निशांत राऊत, सूर्यकांत डोंगरे, हरीशकुमार बन्सोड, नूतन दहिवले, पुर्णिमा शहारे, नीता साखरे, किरण कांबळे, राजेश नंदागवळी यांचा समावेश आहे.**

# गोंदिया शहरात एक धाव सुरक्षेची मिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात



**गोंदिया:** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गोंदिया व मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांच्या तर्फे आयोजित महसूल पंधरवडाचे औचित्य साधून एक धाव सुरक्षेची या उपक्रमांतर्गत गोंदिया येथे मिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली.

आपत्तीचे स्वरूप हे अनिश्चित असते त्यामुळे आपत्तीमध्ये नागरिक व विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते, म्हणून दक्षता व जनजागृती हे आपत्ती व्यवस्थापनामध्ये महत्त्वाचे शस्त्र आहेत, असे मनोगत जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी यावेळेस केले.

या स्पर्धेला जिल्हाधिकारी प्रजित नायर, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, पोलीस उपअधीक्षक नंदिनी चानपूरकर, जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपुढे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी यांनी युवकांना मार्गदर्शक सूचना करून फ्लॅग ऑफ्फ करून स्पर्धेची सुरुवात केली.

विविध आपत्ती संदर्भात युवक व युवतींमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांनी सुरक्षिततेचे नियम पाळावे या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये होमगार्ड, स्काऊट गाईड, एन सी सी, एन एस एस व विविध खेळाडू यांनी आपला सहभाग नोंदविला.

सदर स्पर्धेमध्ये पुरुष गटात प्रथम क्रमांक भुवन मंजुटे द्वितीय क्रमांक आदित्य सोनुले तित्रीय क्रमांक रितेश शेंडे व चतुर्थ क्रमांक योगेश चिखलंडे यांनी प्राप्त केला. तसेच मुलींमध्ये मयुरी ठाकूर प्रथम, मयुरी बडोले द्वितीय, ईशा मरस्कोले तृतीय व आसानी उईचे हिने चतुर्थी क्रमांक प्राप्त केले.

सदर महा मॅरेथॉन स्पर्धा सुव्यवस्थीतरित्या पार पाडण्याकरिता पोलीस विभाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथक, जिल्हा प्रशासनातील कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# जिल्ह्यातील सर्व मतदार केंद्रावर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**गोंदिया:** १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित झाला असून ६ ऑगस्ट २०२४ (मंगळवार) रोजी गोंदिया जिल्हयातील सर्व मतदान केंद्रावर प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर यांनी दिली आहे.सदर संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत १० ऑगस्ट २०२४ (शनिवार) व ११ ऑगस्ट २०२४ (रविवार) आणि १७ ऑगस्ट २०२४ (शनिवार) व १८ ऑगस्ट २०२४ (रविवार) रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. सबब संबंधित विशेष मोहिम अंतर्गत १८-१९ वयोगटातील मतदार, तृतीय पंथीय, देह व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आणि दिव्यांग मतदार यांनी जास्तीत जास्त सहभागी होऊन आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करावे, असे आवाहन त्यांनी केले.

याकरिता आपण आपल्या जवळच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांचेकडे जाऊन मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना ६ चे अर्ज भरुन दयावे किंवा NVSP, VH$A व VPORTAL या पोर्टलवर लॉगीन करुन आपले नांव समाविष्ट करण्याबाबत ऑनलाईन अर्ज सादर करावे. त्यानुसार मतदान यादीत नाव समाविष्ट असलेल्या मतदारांच्या नावामध्ये दुरुस्ती, रहिवाशाचे स्थलांतरण (विधानसभा अंतर्गत/ बाहेरील, मतदार ओळखपत्र बदलून देणे, दिव्यांग म्हणून चिन्हांकीत करावयाचे असल्यास नमुना ८ तसेच आपले मतदार ओळखपत्राशी आधार कार्ड जोडणी करण्याकरिता नमुना ६-ब भरुन संबंधीत आपल्या जवळच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) किंवा NVSP, VH$A व VPORTAL या पोर्टलवर लॉगीन करुन संबंधीत अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करुन विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर यांनी मतदारांना केले आहे.

# रामाटोलावासीयांच्या समस्या त्वरित मार्गी लावा-आ.रहांगडाले



**तिरोडा:** तालुक्यातील अदानी विद्युत प्रकल्पासाठी पूर्नवसित झालेल्या रामाटोलावासींच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशा आदेश आमदार विजय रहांगडाले यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या. तालुक्यात अदानी विद्युत प्रकल्पामध्ये सन २०१२-१३ मध्ये रामाटोला गावाचे पुनर्वसन करण्यात आले. मात्र या गावामध्ये सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबतची तक्रार ग्रामवासियांनी क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांचेकडे केली होती.

त्या तक्रारीच्या आधारावर जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक आयोजित करुन गावातील रस्ते व नाल्याची समस्या, जलजीवन मिशनअंतर्गत गावातील प्रत्येक घरापर्यंत नळाची सुविधा पुरविणे, शुद्ध पाण्याची सुविधा पुरविणे, पुनर्वसित नागरिकांना मिळालेले पट्टे विकण्याची परवानगी देण्यात यावी, रामाटोलावाशीयांना रामाटोला येथे रेशन वाटप करण्यात यावे, बेरोजगारांना रोजगाराकरिता व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात यावे आदी समस्या मार्गी लावण्याबाबत जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी आदेश दिले. या बैठकीमध्ये प्रामुख्याने, उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड, तहसीलदार गजानन कोकडे, जिप सदस्य पवन पटले, शैलेश नंदेश्वर, संजय बैस, पंस सदस्य अजाबराव रिनाईत, जयश्री गुनेरीया, धर्मदास चौधरी, शिवदास पारधी, संतोष चौधरी, अदाणी समुहाचे प्रमुख पियुष दिगावकर, विमुल पटेल व गावकरी उपस्थित होते.

# जिल्हा नियोजन समितीची सभा १४ ऑगस्टला

**गोंदिया :-** जिल्हा नियोजन समितीची सभा मंत्री, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, गोंदिया जिल्हा ना. धर्मरावबाबा आत्राम यांचे अध्यक्षतेखाली बुधवार १४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे आयोजित केलेली आहे.

सभेची विषय सुची खालील प्रमाणे आहे. जिल्हा नियोजन समिती सभा २३ डिसेंबर २०२३ च्या इतिवृत्तास मंजूरी देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत माहे मार्च २०२४ अखेर झालेल्या खर्चास मान्यता प्रदान करणे (सर्वसाधारण योजना, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना बाहयक्षेत्र). जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत राबविण्यात येणा-या योजनांचा माहे जुलै २०२४ अखेर पर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे (सर्वसाधारण योजना, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना बाहयक्षेत्र), जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ च्या अनुषंगाने कामांना मंजुरी प्रदान करणे व अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय. या सभेस सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी अद्ययावत माहितीसह नियोजित वेळेपूर्वी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे.

# लाडकी बहीणसाठी १६ ते २५ ऑगस्ट दरम्यान व्यापक जनजागृती अभियान-राजेंद्र जैन



**गोंदिया:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ प्रत्ये पात्र लााभार्थी बहिणीला या योजनेचा लाभ मिळावा, एकही लााभार्थी वंचित राहू नये यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाच्यावतीने गोंदिया तालुक्यात १६ ते २५ ऑगस्ट दरम्यान जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. यांतर्गत प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक घरापर्यंत जाऊन या योजनेची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्यात येणार असल्याची माहिती माजी आ.राजेंद्र जैन यांनी सोमवारी (दि.१२) राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला जि.प. समाजकल्याण सभापती पूजा सेठ, शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा माधुरी नासरे, किर्ती पटले, विनीत शहारे उपस्थित होते. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे स्त्री-पुरुष समानता साध्य करणे आणि सर्व महिला आणि मुलींना सक्षम करणे हे शाश्वत विकास ध्येयापैकी एक ध्येय आहे. महिलांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय उपक्रमांत संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विविध धोरणे, कार्यक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत. योजनेचा लाभ विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक लाभार्थ्याला मिळावा तसेच ज्यांचे अर्ज रिजेक्ट झालेले आहे. अशा लाभार्थ्यांचे अर्ज भरुन लाभ मिळवून देण्यासाठी या जनजागृती अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाणार असल्याचे माजी आ.जैन यांनी सांगितले. या योजनेच अंमलबजावणी करण्यात गोंदिया तालुका हा राज्यात अग्रेसर असून आतापर्यंत ८२,७८६ लाडक्या बहिणीचे अर्ज पात्र ठरले आहेत. तर जास्तीत-जास्त महिलांचे अर्ज पात्र ठरावेत त्यातील त्रुटी दूर करण्यासाठीसुद्धा या योजनेच्या समितीच्या माध्यमातून प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. जि.प. समाजकल्याण सभापती पूजा सेठ यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले.

# शिक्षिकेवर कारवाई न करणाऱ्या संस्थेची परवानगी रद्द करून प्रशासक नेमा



**गोंदिया:-** गडचिरोली येथे कोट्यवधीचा भूखंड घोटाळा करणाऱ्या व गोंदिया जिल्ह्यातील घोटी येथील आश्रम शाळेत कार्यरत ठगबाज शिक्षिका जयश्री आनंद चंद्रीकापूरे (निकोसे) हिला सेवेतून बडतर्फ करावे, शिक्षिकेवर कारवाई न करणाऱ्या संस्थेची परवानगी रद्द करून प्रशासक नेमावा, अशी मागणी तक्रारकर्ते नागनाथ उर्फ राजू भूसारे यांनी येथील विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत केली.

गडचिरोली शहरातील सोनापूर येथील सर्व्हे क्र. १८/१ मधील ०.५१.५९ हेक्टर आर जमिनीच्या भूखंड घोटाळ्यात जयश्री आनंद चंद्रिकापुरे (४०, रा. गडचिरोली) व विशालकुमार चंद्रकांत निकोसे (३८ रा. गडचिरोली, ह.मु. हिंगणा, ता. नागपूर) यांनी नागनाथ भुसारे व मनोज प्रभुदास सुचक यांचे बनावट संमतीपत्र तयार करून त्यांच्या संमतीशिवाय परस्पर नगररचना विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून एनए परवाना मिळविला. यानंतर भुसारे यांच्या तक्रारीवरून जयश्री व विशालकुमार या बहीणभावांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करून ८ जुलै रोजी अटक करण्यात आली. गडचिरोली न्यायालयाने दोन्ही आरोपींची ११ जुलैपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली. यानंतर पुन्हा न्यायालयाने १६ जुलैपर्यंत आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. सध्या दोन्ही आरोपी जमानतीवर आहेत. जयश्री या गोरेगाव तालुक्यातील घोटी येथील लक्ष्मणराव चंद्रीकापूरे विजाभज माध्यमिक आश्रम शाळेत शिक्षिका पदावर कार्यरत आहे. तिचा राष्ट्रीय शिक्षक कोड टीपी-६२६५४४८८ आहे. ती मालमत्ता खरेदी-विक्रीचा व्यवसाय करते. या व्यवसायायत जयश्रीने अनेकांची फसवणूक केली आहे. गडचिरोली पोलिस ठाणे येथे विविध कलमान्वये तिच्यावर गुन्हे दाखल आहेत. गुन्हा नोंद झालेल्या तथा पोलिस व न्यायालयीन कोठडी भोगलेल्या आरोपीवर संस्थेने नियमानुसार कारवाई करून निलंबीत करणे आवश्यक होते. मात्र संस्थेने अद्यापही कोणतीही कारवाई केली नाही. उल्लेखनिय म्हणजे जयश्री या शाळेत नियमित अध्यापनाचे कार्य करीत नाही, त्यांनी त्यांच्या जागी अध्यापनासाठी एका खाजगी शिक्षिकेची नियुक्ती केली असल्याचे भूसारे यांनी सांगीतले. दरम्यान त्या नियमित वेतन घेत असल्याचेही आपल्या निदर्शनास आल्याचे भूसारे म्हणाले. राजकीय दबावात व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पाठबळावर जयश्री यांच्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप भूसारे यांनी केला आहे. आरोपी जयश्रीला सेवेतून बडतर्फ करावे, संस्थेची परवानगी रद्द करून प्रशासक नेमावा, अशी मागणी तक्रारकर्ते नागनाथ भूसारे यांनी परिषदेत केली. कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देखील भुसारे यांनी यावेळी दिला.

**घोटी येथील अनुदानीत आश्रम शाळा समाज कल्याण विभागाअंतर्गत येत असली तरी निर्णय घेण्याचा सर्वाधिकार संस्थेला आहे. शिक्षिका जयश्री निकोसेविरूद्ध आपल्या विभागाकडे लेखी तक्रार आली नाही. तक्रार आल्यास संस्थेला चौकशी करून कारवाई करण्यासंदर्भात पत्र देऊ, असे समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतूरे यांनी सांगीतले.**


## ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार
### पंचायत समिती गोरेगाव
### जिल्हा परीषद गोंदिया

निविदा सुचना-०२ /२०२४ -२५/ दि. १०/०८/२०२४

ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परीषद गोंदिया हे १५ वा वित्त आयोग अंतर्गत ग्रा.प.दवडीपार येथे ग्रा.प. जवळ शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे तसेच बंधिस्त सिमेंट नाली बांधकाम करणे करणे ई-निविदा जि.प बांधकाम विभाग गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी पध्दतीने आँनलाईन मागवित आहे ई-निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatendess.gov.in या संकेत स्तळावर दिनांक १०/०८/२०२४ पासुन उपलब्ध आहे.

ई-निविदा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिध्दी व दाखल दिनांक | दिनांक १०/०८/२०२४ पासुन |
| २ | ई-निविदा अंतिम दिनांक | दिनांक १७/०८/२०२४ ला.०५.०० वा.पर्यत |
| ३ | ई-निविदा उघण्याची दिनांक | दिनांक १९/०८/२०२४ ला १०.०० वा.शक्य झाल्यास |

विस्तृत माहीती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वाना लागु राहतील.

**सरपंच** ग्रमपचायत कार्यालय दवडीपार.

**ग्रामसेवक** ग्रमपचायत कार्यालय दवडीपार.

